②

# महाराष्ट्र शासन
## समाज कल्याण आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,
## ३ चर्च पथ,पुणे-४११००१

दुरध्वनी क्र. २०२/२६१३७१८६,२६१२७५६९ ईमेल -directorsocialwelfare@yahoo.co.in

*निवेदन*

अनुसूचित जातीच्या १०० विद्यार्थ्यांना सन २०१६-१७ या वर्षात देशातील नामांकित शैक्षणिक संस्थांमध्ये उच्च शिक्षण घेण्यासाठी राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्तीकरिता अर्ज मागविण्यात येत आहेत.

महाराष्ट्र शासन सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य विभागाच्या शासन निर्णय क्र.ईबीसी-२००९ /प्र.क्र.११२ / मादक-२, दिनांक ३१ ऑगस्ट २००९, अन्वये सुधारीत केलेल्या नियमानुसार प्रत्येक वर्षी राज्यातील अनुसूचित जातीच्या (नवबौध्दासहित) १०० विद्यार्थ्यांना देशातील नामांकित शैक्षणिक संस्थांमध्ये उच्च शिक्षण घेण्यासाठी राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती प्रदान करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. त्यानुसार सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षाकरिता अनुसूचित जातीच्या (नवबौध्दासहित) विद्यार्थ्यांकडून दिनांक ३१ ऑगस्ट, २०१६ पर्यंत अर्ज मागविण्यात येत आहेत.

सदर गुणवत्ता शिष्यवृत्तीसाठी खालील प्रमाणे निकष आहेत :-

१) राज्यातील सर्व विभागातील विद्यार्थ्यांना समान संधी देण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र राज्य विभागीय माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण परिक्षा मंडळाच्या परिक्षेत्रातील रहिवासी असलेल्या विद्यार्थ्यांना खालीलप्रमाणे शिष्यवृत्ती देण्यात येईल.

| अ.क्र. | अभ्यासक्रम स्तर | विभागीय शिक्षण परिक्षा मंडळ निहाय (प्रत्येकी विद्यार्थी संख्या) | एकुण विद्यार्थी संख्या (८परिक्षा मंडळे) |
|---|---|---|---|
| १ | पदवी | १० | ८० |
| २ | पदव्युत्तर पदवी/पदवीका | २ | १६ |
| ३ | पदव्युत्तर पदवी/पदवीका (राज्यस्तर) | राज्यस्तरावर गुणानुक्रमे ज्यांना १२ वी मध्ये जास्त गुण मिळाले असे विद्यार्थी | ४ |
| | एकुण | | १०० |

२) महाराष्ट्र राज्य विभागीय माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण परिक्षा मंडळाच्या एखादा विभागीय मंडळाच्या परिक्षेत्रातून संबधित शैक्षणिक वर्षी विहित विद्यार्थी संख्या उपलब्ध झाली नाही तर अन्य विभागीय परिक्षा मंडळातून विद्यार्थ्यांना गुणवत्ते नुसार शिष्यवृत्ती मंजूर करण्यांत येईल.

३) सदर शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थ्यांनी इयत्ता १० वी १२ वी ची परिक्षा महाराष्ट्र राज्य विभागीय माध्यमिक व उच्च माध्यमिक परिक्षा मंडळ अथवा महाराष्ट्र राज्य क्षेत्रातील अन्य परिक्षा मंडळातून उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

४) पदवी अभ्यासक्रमाची शिष्यवृत्तीकरीता इयत्ता १२ वी च्या परिक्षेतील व सी.ई.टी. मधील गुणांची टक्केवारी विचारात घेतली जाईल व गुणानुक्रमे निवड करण्यात येईल. इयत्ता १२ वी/सी.ई.टी. परीक्षेत किमान ५५% गुण मिळविणे आवश्यक राहील.

५) पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या शिष्यवृत्तीकरीता पदवी अभ्याक्रमातील गुणांची टक्केवारी विचारात घेतली जाईल. पदवी परीक्षेमध्ये किमान ५०% गुण मिळविणे आवश्यक आहे.

६) संबंधित निवड वर्षी सदर शिष्यवृत्तीसाठी पात्र विद्यार्थ्यांची संख्या १०० पेक्षा कमी असल्यास, त्यावेळी सदर शासन निर्णयान्वये विहित केलेल्या संस्थेमधील प्रवेशीत अनुसूचित जातीच्या द्वितीय किंवा त्या पुढील वर्षी सदर शिष्यवृत्तीसाठी अर्ज केल्यास त्या विद्यार्थ्यांचे अर्ज विचारात घेता येतील.

७) विद्यार्थी महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असावा.

८) विद्यार्थी महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जाती(नवबौध्दासहित) असावा.

९) विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी अर्ज करेल त्यावर्षी तो प्रथम वर्गाला शिकत असला पाहिजे. तथापि संबंधित निवड वर्षी सदर शिष्यवृत्तीसाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या १०० पेक्षा कमी असल्यास व परिशिष्ट-ब येथील संस्थेमध्ये प्रवेशित अनुसूचित जातीमधील विद्यार्थ्यांनी द्वितीय किंवा पुढील वर्षी शिष्यवृत्तीसाठी अर्ज केल्यास त्यांचे अर्ज योजनेच्या अटी व शर्तीप्रमाणे विचारात घेता येतील.

१०) या शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थ्यांच्या पालकाची उत्पन्नाची वार्षिक मर्यादा जास्तीत जास्त जास्तीत जास्त रु. ४.५०लाख (रु. चार लाख पन्नास हजार फक्त) एवढी राहिल. त्यासाठी सक्षम अधिकाऱ्याचा सन २०१५-१६ या आर्थिक वर्षाचा उत्पन्नाचा दाखला जोडावा. पालक नोकरीत असल्यास आयकर विवरणपत्र किंवा आयकर फॉर्म १६ जोडावे.

११) शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थ्यास आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे. यांच्याकडे अर्ज करणे आवश्यक आहे.

१२) सदरहु शिष्यवृत्ती देश पातळीवरील परिशिष्ट - ब येथील मान्यताप्राप्त संस्थामधील अभ्यासक्रमासाठी लागू राहिल.

१३) वरीलप्रमाणे पात्र झालेल्या विद्यार्थ्यास त्या त्या शैक्षणिक संस्थेने ठरवून दिलेले पुर्ण शैक्षणिक शुल्क, परीक्षा शुल्क,नोंदणी फी, जिमखाना, ग्रंथालय,संगणक शुल्क हे समाज कल्याण आयुक्तालयामार्फत थेट संस्थेला नियमाप्रमाणे देण्यात येईल.

१४) विद्यार्थ्याला त्या शैक्षणिक मान्यताप्राप्त संस्थेतील वसतिगृह व भोजन शुल्क यावा त्यांच्या आकारणी प्रमाणे पुर्ण खर्च देण्यात येईल. वर्षभरात एकदाच ही रक्कम देण्यात येईल. वसतिगृहात न राहणाऱ्या विद्यार्थ्यांना भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजने प्रमाणे निर्वाह भत्ता देण्यात येईल. संस्थेच्या वसतिगृहास प्रवेश मिळण्यास पात्र असणाऱ्या तथापि जागेअभावी वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्याला संस्थेने आकारणी केलेले वसतिगृह व भोजन शुल्क देण्यात येईल.

१५) या अभ्यासक्रमासाठी लागणारी पुस्तके, शैक्षकिण साहित्य त्याचप्रमाणे इतर शैक्षणिक खर्च यासाठी एकूण रु. १०,०००/- प्रत्येक वर्षी देण्यात येतील.

१६) आय.आय.टी. मधील प्रिपरेटरी कोर्सला सदर शिष्यवृत्तीचा लाभ मिळणार नाही.

१७) शिष्यवृत्ती अर्जासोबत विद्यार्थ्याने नियमाप्रमाणे खालील कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे.
(१) जातीचा दाखला (सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेला)
(२) उत्पन्नाचा दाखला (तहसिलदार पेक्षा कमी दर्जाच्या नसलेल्या सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेला)
(३) महाराष्ट्राचा रहिवासी असल्याबाबत (सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेला) अधिवास प्रमाणपत्र.
(४) संस्थेत प्रत्यक्ष प्रवेश मिळाल्याचे संबंधित नामांकित संस्थेचे पत्र.
(५) जात पडताळणी प्रमाणपत्र
(६) संबंधित संस्थेचे पुर्ण वर्षाचे फी विवरणपत्र
(७) मागील वर्षाचे गुणपत्रक किंवा उत्तीर्ण झालेचा पुरावा

(१८) विद्यार्थ्यांची निवड आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या समितीद्वारे करण्यात येईल .

(१९) निवड केलेल्या विद्यार्थ्यांना आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे हे नियमाप्रमाणे अनुज्ञेय शिष्यवृत्ती मंजूर करतील.

(२०) या शिष्यवृत्तीसाठी निवड झालेल्या विद्यार्थ्याला भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्तीचा लाभ मिळणार नाही.

(२१) विद्यार्थ्याने शिष्यवृत्ती मिळण्यासाठी चुकीची अथवा दिशाभूल करणारी माहिती दिली असल्याचे आढळून आल्यास तो फौजदारी गुन्ह्याखाली कारवाईस पात्र ठरेल व त्याला अदा करण्यात आलेली शिष्यवृत्ती महसूली अधिनियमाखाली वसूलपात्र राहिल.

(२२) अभ्यासक्रम अर्धवट सोडल्यास शिष्यवृत्तीची संपूर्ण रक्कम त्याच्याकडून सदरहू अधिनियमाद्वारेच वसूल करण्यात येईल.

(२३) १०० विद्यार्थ्यांपेक्षा जास्त अर्ज प्राप्त झाल्यानंतर शिष्यवृत्ती देण्याचा प्राधान्यक्रम खालीलप्रमाणे राहिल :-

| | | |
|---|---|---|
| आय.आय.एम. व इतर बिझीनेस स्कूल्स | - | प्रथम प्राधान्य |
| आय.आय.टी. इतर संस्था | - | द्वितिय प्राधान्य |
| एन.आय.टी., ॲग्रीकल्चर व इतर संस्था | - | तृतिय प्राधान्य |

(२४) या योजनेअंतर्गत शिष्यवृत्ती मंजूर करण्याचा अंतिम अधिकार शासनास राहिल.

(२५) शिष्यवृत्तीसाठी निवड प्रक्रिया ही सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय विस्तारभवन, मुंबई ३२ यांच्या दि.३१.८.२००९ च्या शासन निर्णयातील नमूद केलेल्या पध्दती प्रमाणे होईल.

(२६) अर्ज विहित नमुन्यामध्ये सादर करणे आवश्यक आहे. अपुर्ण आणि विहित मुदतीनंतर प्राप्त होणारे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

(२७) तसेच विहित नमुन्यातील अर्जाचा नमुना महाराष्ट्र शासनाचे संकेतस्थळ (वेबसाईट) "www.maharashtra.gov.in" आणि सामाजिक न्याय विभागाच्या "https://mahaeschol.maharashtra.gov.in" तसेच "https://sjsa.maharashtra.gov.in" या संकेतस्थळावर संपर्क साधावा. विहितनमुन्यातील अर्ज संकेतस्थळावरुन डाऊनलोड करुन तो परीपुर्ण भरुन आवश्यक त्या कागदपत्रांसह दि. ३१.०८.२०१६ पुर्वी आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, ३ चर्च पथ, पुणे-४११००१ यांचेकडे सादर करावा.

स्थळ : पुणे
दिनांक : / /२०१६

आयुक्त, समाज कल्याण,
महाराष्ट्र राज्य, पुणे

**Anneuxer-B**

| Sr No | I. I. T. | I. I. M. | N. I. T. | Agricultural | Other |
|---|---|---|---|---|---|
| 1 | All Reputed I.I.T. in the Country | All Reputed I.I.M. in the Country | All Reputed N.I.T. in the Country | National Institute of Agricultural Management, Hydrabad | Indian Business School, Hydrabad |
| 2 | | | | Indian Agricultural Research Institute, New Delhi | All India Institute of Medical Sciences, New Delhi |
| 3 | | | | Acharya N G Ranga Agricultural University Hyderabad | India Institute of Sciences, Banglore |
| 4 | | | | Allahabad Agricultural Institute, Allhabad | Birla Institute of Technology, Pilani, Rajasthan and Ranchi Jharkhand |
| 5 | | | | Anand Agricultural University, Anand, Gujrat | Veermata Jijabai Technology Institute, Matunga, Mumbai |
| 6 | | | | Assam Agricultural University, Jorhat, Assam | College of Engineering, Pune |
| 7 | | | | Bidhan Chandra Krushi Vidyalaya, Mohanpur, West Bengal | U.I. C. T. Mumbai |
| 8 | | | | Birsa Agricultural University, Ranchi, Jharkhand | Forest Research Institute Deharadhun |
| 9 | | | | Central Agricultural University, Imphal, Manipur | Central Electronics Engineering Research Institute, Pillani |
| 10 | | | | Chandra Shekhar Azad University of Agricultural and Technology, Kanpur, U.P. | Central Institute of Fisheries Nautical and Engineering Trashing (CIFNET), Kochi |
| 11 | | | | Chaudhary Charan Singh Haryana Agricultural University, Hisar, Haryana | Central Institute of Psychiatrg, Ranchi |
| 12 | | | | Dr. Balasaheb Sawant Kokan Krishi | Central Leather Research Institute |

| Sr No | I. I. T. | I. I. M. | N. I. T. | Agricultural | Other |
|---|---|---|---|---|---|
| | | | | Vidyapeeth, Dapoli, Ratnagiri | Chennai |
| 13 | | | | Dr. Panjabrao Deshmukh Krishi Vidyapeeth, Akola, Maharashtra | Dr. Ambedkar Institute of Productivity, Chennai |
| 14 | | | | Jawaharlal Nehru Krishi Vishwavidyalaya Jabalpur, M. P. | National Diary Research Institute Karnal Haryana |
| 15 | | | | Indira Gandhi Agricultural University, Raipur, Chattisgargh | National Chemical Laboratory, Pune Maharashtra State |
| 16 | | | | Kerala Agricultural University, Thrissur, Kerala | National Physical Laboratory, New Delhi |
| 17 | | | | Maharana Pratap University and Agricultural of Technology Udaipur, Rajasthan | Central Drug Research Institute, Lucknow |
| 18 | | | | Mahatma Krishi Vidyapeeth, Rahuri, Maharashtra | Central Food Technological Research Institute, Mysore |
| 19 | | | | Marathwada Krishi Vidyapeeth Parbhani Maharashtra | National Institute of Oceangraphy Panaji ( Goa ) |
| 20 | | | | Orissa University of Agricultural and Technology Bhuvaneshwar | Indian Institute of Horticultural Research, Banglore |
| 21 | | | | Sardar Krushinagar Dantiwada Agricultural University Banaskantha, Gujrat | C-Dac Pune |
| 22 | | | | Sardar Vallabh Bhai Patel University of Agricultural and Technology, Meerut, M. P. | National Institute of Design in Banglor |
| 23 | | | | Sher-E-Kashmir University of Agricultural Sciences and Technology, | University of Petrolium & Energy Dehradun, |

| Sr No | I. I. T. | I. I. M. | N. I. T. | Agricultural | Other |
|---|---|---|---|---|---|
| | | | | Jammu | |
| 24 | | | | Tamilnadu Agricultural University Coimbatore, Tamil Nad | Gujrat National Law University Gujrat |
| 25 | | | | MBM University of Agricultural Science, Banglore, Karnataka | Film & Tevelision Institute, Pune |
| 26 | | | | Indian Vaternary Research Institute, Mukteshwar and Izzatnagar, Bareli, U.P. | Indian Institute of Sceince, Education & Reserch, Pune |
| 27 | | | | -- | Jamanalal Bajaj Institute of Management, Mumbai |
| 28 | | | | -- | National Institute of Food Technology Entrepreneurship and management, Kundli, district Sonepat, Haryana. |
| 29 | - | | | -- | Indian Maritime University, Chennai,Mumbai, Kolokatta, Vishakhapattanam |
| 30 | | | | -- | Pandit deenadayal Petroleum University, Gujarat. |

**(Narendra Poyam) I.A.S.**
**Commissioner, Social Welfare,**
**Maharashtra State, Pune**

## अर्जाचा नमुना

देशातील शैक्षणिक संस्थेमध्ये उच्च शिक्षण घेण्यासाठी अनुसुचित जातीच्या १०० विद्यार्थ्यांना
" राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती योजना "
" सन २०१६-२०१७ "

प्रति
मा आयुक्त
समाज कल्याण आयुक्तालय,
महाराष्ट्र राज्य,
३, चर्च रोड,
पुणे ४११ ००१

| पासपोर्ट आकाराचे साक्षांकित रंगीत छायाचित्र |
|---|

विषय - राज्यातील अनुसुचित जातीच्या १०० विद्यार्थ्यांना देशातील नामांकित शैक्षणिक संस्थांमध्ये उच्च शिक्षण घेण्यासाठी " राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती योजना "

महोदय,

" राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती योजना " या योजनेंतर्गत शिष्यवृत्ती मिळण्यासाठी मी माझी वैयक्तिक व कुटुंबाची माहिती या अर्जाद्वारे खालीलप्रमाणे सादर करीत असून, मला सादर शिष्यवृत्ती मंजूर करण्यात यावी, अशी विनंती आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | विद्यार्थ्याचे संपूर्ण नाव | ---------------------------- |
| २ | पत्रव्यवहाराचा पूर्ण पत्ता<br><br>संपर्काचा दूरध्वनी क्रमांक /मोबाईल क्रमांक<br>( एस.टी.डी कोडसह) | ----------------------------<br>----------------------------<br>----------------------------<br>----------------------------<br>----------------------------<br>---------------------------- |
| ३ | (अ) विद्यार्थ्याची जात<br><br>(ब) पोटजात | ----------------------------<br><br>---------------------------- |
| ४ | विद्यार्थ्यांची जन्मतारीख | (अंकामध्ये)----------------------<br><br>(अक्षरी) ---------------------- |
| ५ | (अ) विद्यार्थ्याच्या पालकाचे संपूर्ण नाव | ---------------------------- |

| | | |
|---|---|---|
| | (ब) निवासस्थानाचा पूर्ण पत्ता | ------------------------------------------<br>------------------------------------------<br>------------------------------------------<br>------------------------------------------<br>------------------------------------------ |
| | (क)संपर्काचा दूरध्वनी क्रमांक/मोबाईल क्रमांक<br>( एस.टी.डी कोडसह) | ------------------------------------------ |
| | (ड) ई - मेल पत्ता | ------------------------------------------ |
| ६ | (अ) विद्यार्थ्यांच्या वडिलांचा व्यवसाय<br>व नोकरी करीत असल्यास<br>शासकीय / निमशासकीय / खाजगी<br>उपक्रमामधील हुद्दा / पदनाम | ------------------------------------------<br>------------------------------------------<br>------------------------------------------<br>--- |
| | (ब) कार्यालयाचा पत्ता | ------------------------------------------<br>------------------------------------------<br>------------------------------------------<br>------- |
| | (क) दूरध्वनी क्रमांक /मोबाईल क्रमांक<br>( एस.टी.डी कोडसह) | ------------------------------------------<br>- |
| | (ड) ई - मेल पत्ता | ------------------------------------------<br>- |
| ७ | पालकाचे सन २०१५-१६ चे एकुण वार्षिक उत्पन्न<br>वडील<br>आई<br>थोरला भाऊ<br>थोरली बहीण<br>लहान भाऊ<br>लहान बहीण<br>स्वत:<br><br>एकुण कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न | <br><br><br>रु.<br>रु<br>रु<br>रु<br>रु<br>रु |
| ८ | वडिल हयात नसतील तर मृत्युचा दाखला सोबत जोडलेला आहे किंवा नाही. | होय / नाही |

| ९ | विद्यार्थ्यांची शैक्षणिक पात्रता इयत्ता १२ वी व त्या पुढीलप्रमाणे |
|---|---|

| विवरण | बारावी | पदवी | पदव्युत्तर |
|---|---|---|---|
| परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | | | |
| उत्तीर्ण अभ्यासक्रमांचे नाव | | | |
| उत्तीर्ण झालेल्या शैक्षणिक संस्थेचे नाव व विद्यापीठाचे नाव | | | |
| परीक्षा मंडळाचे नाव | | | |
| प्राप्त केलेले गुण | | | |
| गुणांची टक्केवारी | | | |

| १० | विद्यार्थ्यांच्या कुटुंबाचा तपशील | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | क्रमांक | संपूर्ण नाव | वय | विद्यार्थ्याशी असलेले नाते | व्यवसाय | एकुण वार्षिक उत्पन्न |
| | १ | | | | | |
| | २ | | | | | |
| | ३ | | | | | |
| | ४ | | | | | |
| | ५ | | | | | |
| | ६ | | | | | |
| | ७ | | | | | |
| | ८ | | | | | |
| | ९ | | | | | |
| | १० | | | | | |
| | | | | कुटुंबाचे एकुण वार्षिक उत्पन्न | | |

| ११ | विद्यार्थ्यांने प्रवेश घेतलेल्या संस्थेचे नाव | ------------------------------------------------ |
|---|---|---|
| | संस्थेचा संपूर्ण पत्ता | |

| | | |
|---|---|---|
| | दूरध्वनी क्रमांक (एस टी डी कोड सह) / ई-मेल ॲड्रेस | |
| १२ | विद्यार्थ्याने प्रवेश घेतलेल्या अभ्यासक्रमाचे नाव /प्रवेश घेतल्याचा दिनांक | |
| १३ | अभ्यासक्रमाचा एकुण कालावधी व प्रवेश कोणत्या वर्गात घेतला (प्रथम / द्वितीय / तृतिय / चतुर्थ) | |
| १४ | प्रथम वर्षासाठी येणारा अंदाजित खर्च<br>शिक्षण फी<br>परीक्षा फी<br>वसतीगृह खर्च<br>भोजन खर्च<br>इतर खर्च (तपशील दयावा)<br>एकुण<br>(टीप - स्थानिक विद्यार्थ्यांना वसतीगृह खर्च व भोजन खर्च अनुज्ञेय नाही.) | |
| १५ | शिष्यवृत्ती अदा करण्याच्या संदर्भातील माहिती<br>१. प्रवेश घेतलेल्या संस्थेचे नाव व संपूर्ण पत्ता<br><br>दूरध्वनी क्रमांक<br>फॅक्स<br>ई- मेल ॲड्रेस<br><br>२. विद्यार्थ्याचा पत्रव्यवहाराचा पत्ता/दुरध्वनी क्रमांक<br><br>३. धनादेश संस्थेतील कोणाच्या नावाने काढावयाचा आहे त्यांचा हुद्दा व पत्ता<br><br>४. धनादेश ज्या बँकेच्या नावाने काढावयाचा आहे त्या<br>अ) बँकेचे नाव<br>ब) कोड नंबर<br>क) खाते क्रमांक | |

आम्ही असे जाहिर करतो की, वर सादर केलेली सर्व माहिती संपूर्णत: सत्य आहे. ही माहिती खोटी आढळल्यास अर्जदार सदर शिष्यवृत्तीस अपात्र ठरेल. तद्नतच फौजदारी कारवाईस पात्र राहील.

आम्ही असेही जाहीर करतो की, सदर शिष्यवृत्ती योजनेच्या अटी व शर्ती आम्ही पूर्णपणे वाचल्या असून आम्हाला समजल्या आहेत आणि त्या आम्हाला मान्य आहेत.

ठिकाण :

विद्यार्थ्यांची सही:

विद्यार्थ्यांचे नाव :

दिनांक :

वडिलांची सही :

वडिलांचे नाव :

सहपत्रे -

१) सक्षम प्राधिका-याने दिलेला जातीचे प्रमाणपत्र तसेच जात वैधता प्रमाणपत्र

२) सक्षम प्राधिका-याने महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असल्याबाबत दिलेले प्रमाणपत्र.

३) इयत्ता बारावी आणि पदवी अभ्यासक्रमाच्या गुणपत्रिकेची व प्रमाणपत्रांच्या सत्यप्रती.

४) सक्षम प्राधिका-याने दिलेले उत्पन्नाचे प्रमाणपत्र :- या शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थ्यांच्या पालकाची उत्पन्नाची मर्यादा वार्षिक जास्तीत जास्त रु.४.५० लाख (अक्षरी रुपये : चार लाख पन्नास हजार फक्त) एवढी राहील. (सक्षम अधिकाऱ्याचा सन २०१५-१६ या आर्थिक वर्षाचा), (यामध्ये विद्यार्थी व कुटुंबात इतर कोणी नोकरी व्यावसाय करित असल्यास त्यांचे एकत्रित उत्पन्न नमूद करावे व त्यांच्या बाबतचे आयकर विवरणपत्र (१६ नं. फॉर्म) अर्जासोबत सादर करावे. वडिल हयात नसल्यास तसा अर्जात उल्लेख करुन मृत्युचा दाखला जोडणे आवश्यक आहे किंवा विभक्त असल्यास तसे अर्जात नमूद करुन त्याबाबतचे न्यायालयाचे कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे.)

५) ज्या संस्थेत प्रत्यक्ष प्रवेश मिळाला आहे त्या संबंधित संस्थेचे पत्र व त्या संस्थेचे शुल्क आकारणीसंबंधीचे विवरणपत्र. - शिक्षण फी, परीक्षा फी, वसतीगृह खर्च, भोजन खर्च यासह असणे आवश्यक

६) स्थानिक विद्यार्थी असतील तर त्यांनी वसतीगृह व भोजनाबाबत संस्थेचे प्रमाणपत्र घेऊन ते अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

७) दोन राजपत्रित अधिका-यांचे ओळख / शिफारसपत्र.

८) अभ्यासक्रम पूर्ण न केल्यास / अर्धवट सोडल्यास शासनाने केलेला पूर्ण खर्च परत करण्यात येईल याबाबत रु १००/- च्या स्टँप पेपरवरील हमीपत्र.

९) विद्यार्थ्यांनी प्रवेशासाठी भरावयाच्या / भरलेल्या फी चा तपशील

१. शिक्षण फी

२. परीक्षा फी

३. नाव नोंदणी फी

४. वसतीगृह भाडे

५. वसतीगृहाचा इतर खर्च

६. भोजन खर्च

७. इतर खर्च

८. पुस्तके व साहित्यावरील खर्च

९. विमा

१०. अभ्यासक्रमानुसार इतर आवश्यक खर्च (सविस्तर माहिती जोडावी)

११. संस्थेकडून/विद्यापीठाकडून शिक्षण फी किंवा इतर फी माफ झाली असल्यास त्याचे विवरणपत्र

१२. अन्य स्कॉलरशिप मिळाली असल्यास त्याची माहिती.

टिप :-

१) अपूर्ण व विहित मुदतीनंतर प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

२) अर्जासोबत विहित कागदपत्रे जोडणे बंधनकारक आहे. अपूर्ण स्वरुपातील अर्ज व आवश्यक कागदपत्राअभावी, देशांतर्गत शिष्यवृत्तीसाठी समितीने अपात्र ठरविलेल्या विद्यार्थ्यांना या आयुक्तालयामार्फत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

३) ज्या विद्यार्थ्यांनी अर्जासोबत कागदपत्रे जोडलेले आहेत. तथापी ते नियम व अटींच्या निकषानुसार देशांतर्गत शिष्यवृत्तीसाठी पात्र झालेले नाहीत अशा विद्यार्थ्यांची निवड झालेली नाही. असे गृहित धरावे. याबाबत त्यांच्याशी या कार्यालयाकडून पत्रव्यवहार केला जाणार नाही.

४) अर्जासोबत जोडलेले सर्व कागदपत्रे साक्षांकित करण्याची जबाबदारी विद्यार्थ्यांची राहील याची नोंद घ्यावी.

.....................

(१०० रु. च्या स्टॅम्पवर)

<u>हमीपत्र</u>

मी.............................................................................राहणार (पत्ता).............................................................................................................येथे राहत असून माझी महाराष्ट्र शासनामार्फत देशांतर्गत.............................................................येथे ...........................................या वर्षाच्या अभ्यासक्रमासाठी सन २०१६-१७ या वर्षाकरिता देशांतर्गत शिष्यवृत्तीसाठी निवड झाली आहे. त्यानुषंगाने मी खालील प्रमाणे हमी देत आहे.

माझा देशातील (विद्यापीठाचे नांव) ......................................................................................... येथील (अभ्यासक्रमाचे नांव) .......................................... हा (कालावधी) ...................................... अभ्यासक्रम संपल्यानंतर मी माझ्या ज्ञानाचा देशासाठी उपयोग करीन याची मी हमी देत आहे.

मला शासनाने मंजूर केलेले, विद्यापीठ व अभ्यासक्रमामध्ये परस्पर बदल करणार नाही याची मी हमी देत आहे.

अर्जासोबत सादर केलेली कागदपत्रे/ दस्त हे खोटे व बनावट असल्याचे आढळून आल्यास शिष्यवृत्ती पोटी मिळालेली सर्व रक्कम व्याजासह परत करण्याची हमी देत आहे.

कोणत्याही कारणास्तव अभ्यासक्रम अर्धवट सोडल्यास शिष्यवृत्ती पोटी मिळालेली सर्व रक्कम ही कुटुंबाच्या मालकीच्या / जामीनदार यांच्या स्थावर मालमत्ते मधून एकरकमी भरपाई करण्याची हमी देत आहे.

वरील नमुद केलेला सर्व मजकूर बरोबर असून तो मी वाचून समजून घेऊन आज दिनांक ..................रोजी मुक्कामी सही केली असे. वरील मजकूरापैकी कोणताही मजकूर खोटा आढळल्यास मी भारतीय दंड संविधान कलम १९३ (२), १९९,२०० अन्वये शिक्षेस पात्र असेन.

| विद्यार्थी | पालक | जामीनदार |
|---|---|---|
| नाव : | नाव : | नाव : |
| पत्ता : | पत्ता : | पत्ता : |
| मो.नं.: | मो.नं.: | मो.नं.: |

महाराष्ट्र शासन

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,

समाज कल्याण आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,३ चर्च पथ,पुणे-४११००१

## अनुसूचित जातीच्या १०० विद्यार्थ्यांना देशातील नामांकित शैक्षणिक संस्थांमध्ये उच्च शिक्षण घेण्यासाठी राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती

महाराष्ट्र शासनाच्या सामजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षाकरिता देशातील शैक्षणिक संस्थांमध्ये उच्च शिक्षण घेण्यासाठी प्रवेश घेतलेल्या अनुसुचित जाती/नवबौध्द विद्यार्थ्यांकडून राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्तीसाठी अर्ज मागविण्यात येत आहेत.

अटी व शर्ती

- विद्यार्थी महाराष्ट्र राज्यातील अनुसुचित जाती/नवबौध्द असावा.
- विद्यार्थी महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.
- विद्यार्थ्याच्या पालकाची वार्षिक उत्पन्न मर्यादा रु.४.५० लाख इतकी राहिल.
- विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी अर्ज करेल त्यावर्षी तो अभ्याक्रमाच्या प्रथम वर्गाला शिकत असला पाहिजे.
- विद्यार्थी इ.१० व १२वी ची परिक्षा महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक परिक्षा मंडळ अथवा महाराष्ट्र राज्य क्षेत्रातील अन्य परिक्षा मंडळातून उत्तीर्ण होणे आवश्यक राहिल.
- पदवी अभ्यासक्रमासाठी इ. १२ वी व सी.ई.टी.परिक्षेमध्ये किमान ५५% गुण मिळविणे आवश्यक राहिल.
- पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी पदवी परिक्षेमध्ये किमान ५०% गुण असावेत.
- सदरहु शिष्यवृत्ती देश पातळीवरील मान्यताप्राप्त संस्थामधील अभ्यासक्रमासाठी लागू राहिल. संस्थांची यादी संकेतस्थळावरील परिशिष्ठ "ब" नुसार पहावयास मिळेल

लाभाचे स्वरुप

- शैक्षणिक संस्थेने ठरवून दिलेले पुर्ण शैक्षणिक शुल्क, परीक्षा शुल्क, नोंदणी फी, जिमखाना, ग्रंथालय, संगणक शुल्क देण्यात येईल.
- शैक्षणिक संस्थेतील वसतिगृह व भोजन शुल्क याचा त्यांच्या अकारणीप्रमाणे खर्च देण्यात येईल.
- शैक्षणिक संस्थेच्या वसतिगृहात जागेअभावी प्रवेश न मिळाल्यास सदर विद्यार्थ्यांना संस्थेने आकारणी केलेले वसतिगृह व भोजन शुल्क देण्यात येईल.
- वसतिगृहात न राहणाऱ्या विद्यार्थ्यांना भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजने प्रमाणे निर्वाहभत्ता देण्यात येईल.
- सदर अभ्यासक्रमासाठी लागणारी पुस्तके, शैक्षणिक साहित्य त्याचप्रमाणे इतर शैक्षणिक खर्च यासाठी एकूण रु. १००००/- प्रत्येक वर्षी देण्यात येईल.

**अर्ज भरण्याची अंतिम दिनांक: ३१.०८.२०१६ राहिल.**

अर्जाचा नमुना व अधिक माहितीसाठी पुढील संकेतस्थळाला भेट द्यावी : "www.maharashtra.gov.in/career", "https://mahaeschol.maharashtra.gov.in" तसेच "https//sjsa.mahrashtra.gov.in"

स्थळ :- पुणे

दिनांक :- /०५/२०१६

(नरेंद्र पोयाम), भा.प्र.से.

आयुक्त, समाज कल्याण,

महाराष्ट्र राज्य, पुणे